

संदेश लखुजी जाधव
सभापती, स्थायी समिती
वसई विरार शहर महानगरपालिका

मा. अध्यक्ष महोदय, व सन्मा. सभागृह,

लोकनेते मा. आमदार श्री. हितेंद्रजी ठाकूर साहेब व मा. प्रथम महापौर श्री. राजीवजी पाटील साहेब, मा. महापौर श्री. नारायणजी मानकर साहेब, यांच्या कुशल नेतृत्वाखाली काम करणेस मला संधी मिळाली यात मी धन्यता मानतो. वसई - विरार शहर महानगरपालिकेच्या लोकनियुक्त लोकप्रतिनिधींनी तयार केलेला हा पाचवा व सभापती स्थायी समिती म्हणून माझे कार्यकाळातील पहिला व परिवहन उपक्रमाचा परिवहन समितीने तयार केलेला प्रथम स्वतंत्र अर्थसंकल्प सादर करण्याचा बहुमान मला मिळाला याबद्दल मी त्यांचा व आपणा सर्वांचा अत्यंत आभारी आहे. महानगरपालिकेच्या कामकाजासाठी आपले आदरणिय लोकनेते, प्रथम महापौर, महापौर व इतर सन्मा. पदाधिकाऱ्यांसह दिलेल्या भेटींमध्ये मा. ना. मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब, विधानपरिषदेचे उपसभापती मा. ना. श्री. वसंतरावजी डावखरे साहेब, मा. खासदार श्री. चिंतामणजी वनगा साहेब, पालकमंत्री मा. ना. श्री. विष्णूजी सावरा साहेब, तत्कालीन मुख्यमंत्री मा. श्री. पृथ्वीराजजी चव्हाण साहेब, तत्कालीन उपमुख्यमंत्री मा. श्री. अजितदादा पवार साहेब, तत्कालीन पालकमंत्री मा. ना. श्री. गणेशजी नाईक साहेब, तत्कालीन खासदार मा. श्री. बळीरामजी जाधव साहेब, मा. आमदार श्री. विलासजी तरे साहेब, मा. आमदार श्री. क्षितीजजी ठाकूर साहेब, मा. आमदार श्री. निरंजनजी डावखरे साहेब, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आजी माजी आयुक्त तसेच केंद्र शासनाचे व राज्य शासनाचे मा. सनदी अधिकारी यांच्या वेळोवेळीच्या सदिच्छा व मार्गदर्शन आपल्या पाठीशी सदैव राहीले आहे. बहुजनांचा विचार करुन बहुजनांच्या हितासाठी असलेला बहुजनांचाच हा अर्थसंकल्प सादर करताना आदरणिय लोकनेते आमदार श्री. हितेंद्रजी ठाकूर साहेब, मा. महापौर श्री. नारायणजी मानकर साहेब, मा. प्रथम महापौर श्री. राजीवजी पाटील साहेब, मा. प्रथम उपमहापौर श्री. सगिरजी डांगे साहेब, मा. उपमहापौर श्री. रुपेशजी जाधव साहेब, मा. सभागृह नेते श्री. उमेशजी नाईक साहेब, मा.स्थायी समितीचे प्रथम सभापती मा. श्री. जितेंद्रजी शहा साहेब, मा. स्थायी समितीचे द्वितीय सभापती अजीवजी पाटील साहेब यांचे नियमित व विशेष मार्गदर्शन तसेच सर्व प्रभाग समित्यांचे सभापती सर्व पदाधिकारी यांनी मला वेळोवेळी भेटुन केलेल्या मौलीक

सुचना यासर्वांचे प्रतीबिंब या अर्थसंकल्पात उमटले आहे. मा. विरोधी पक्षनेत्यांसह, सर्व सन्मा. गटनेते व सदस्यांकडून तसेच सर्व सन्मा. नागरीकांकडून देखील त्यांचे विचार व अपेक्षा आणि कल्पना जाणून घेण्याचा आम्ही प्रयत्न केला असुन त्याबाबीदेखील या अर्थसंकल्पात विचारात घेतल्या आहेत.

तिसरी मुंबई म्हणून नावारुपाला येत असलेल्या आपल्या या महानगरात, मुंबईसह अन्य, विकसीत महानगरात कामधंद्यानिमीत्त रोज ये - जा करणारे अनेक मान्यवर नागरीक वास्तव्य करीत आहेत. त्यामुळे त्या आधीच विकसीत झालेल्या महानगरातील सोयीसुविधांची तुलना नकळतपणे आपल्या महानगराशी होणे व त्यांनी तसे करणे स्वाभाविक आहे. जनतेच्या या भावभावनांचा सर्वकंष विचार करुन आपल्या वसई विरार महानगराच्या विकासाचा प्रगल्भ दृष्टीकोन समोर ठेवणारे आपले लोकनेते आमदार मा. श्री. हितेंद्रजी ठाकूर साहेब हे आम्हाला वेळोवेळी सोयी सुविधांबाबत मार्गदर्शन करीत असतात त्यामुळे त्यांच्या द्रष्टेपणाचे प्रतिबींब या अर्थसंकल्पात जागोजागी उमटले आहे. याचा आम्हास सार्थ अभिमान आहे.

गतवर्षाच्या प्रत्यक्ष जमा खर्चाचा आढावा, निश्‍चित उत्पन्नाचे मार्ग, भविष्यकालीन विकास योजना, मुलभूत व पायाभूत गरजा, महानगरातील सर्व समाज घटकांच्या महानगरपालिकेकडून असलेल्या वाढत्या अपेक्षा याबाबींचा विचार करुन सर्व समावेशक व लोकाभिमुख असा अर्थसंकल्प मा. स्थायी समितीने तयार करुन आपणापुढे ठेवला आहे. सन २०११-१२-१३-१४-१५ या वित्तीय वर्षात अर्थसंकल्पीय तरतूदीनुसार हाती घेतलेली कामे लगतनंतरच्या वर्षात आवश्यक ती कार्यवाही होऊन पूर्ण होत गेल्याने अर्थसंकल्पातील बहुतांशी योजना मार्गी लागल्या आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९, च्या कलम, १०२, मधील तरतूदींचा विचार करता विकास कामांना प्रशासकिय मान्यता देण्यापुर्वी अर्थसंकल्पात आवश्यक ती तरतूद असणे गरजेचे असल्याने अर्थसंकल्पीय वर्षात तरतूदी करुन तरतूदीनुसार प्रशासकीय मंजूरीनंतर कामे हाती घेऊन लगतनंतरच्या वर्षात ती पूर्ण झाली आहेत. पण त्या कामांची प्रत्यक्ष प्रदाने मात्र लगतनंतरचे वर्षात होत असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेऊन अशा तरतूदी पुढील वर्षात वेळोवेळी करण्याच्या दृष्टीने कार्यवाही प्रस्तावित केली आहे. ज्यायोगे अर्थसंकल्प व जमा - खर्चात फारशी तफावत दिसणार नाही.

विकास आराखडा तयार करुन त्यानुसार कामाचे नियोजन करुन नियोजनबद्ध विकास करणेसाठी कृती आराखडा तयार करणेची कार्यवाही आता पुर्ण झाली असल्याने त्यामुळे संपुर्ण क्षमतेने जलद गतीने समाधानकारकरित्या विकास कामे पूर्ण होण्याचा निर्माण झालेला विश्वास, यामुळे सन २०१५-१६ मध्ये हाती घ्यावयाच्या अनेक कामांबाबत फेब्रुवारी २०१५, पासूनच सुरु केलेली प्रशासकिय मान्यता देण्याची व अंदाजपत्रक तयार करणेची कार्यवाही व त्याची काटेकोर अंमलबजावणी या कामी नियोजीत उपाय योजना, या

**सर्व बाबींचा विचार करता अपेक्षित कामे मुदतीत पुर्ण होणार असल्याने आपणा सर्वांच्या सहकार्याने उपलब्ध निधीचा सुयोग्य विनीयोग १००% होईल याचा मला व मा. स्थायी समितीस विश्वास आहे.**

**कोणत्याही प्रकारचे नविन कर अथवा फी आकारणी तसेच प्रचलित कर आणि फी चे दरात कोणतीही वाढ न करता मा. स्थायी समितीने सादर केलेला अपेक्षित जमा व अपेक्षित खर्च हा सर्व समाज घटकांना यथोचित न्याय देण्याचा प्रयत्न करणारा आहे, असे मा. स्थायी समितीचे मत आहे.**

पी बजेट, जेंडर बजेट व अंध अपंगासाठीच्या बजेटसह सर्वसाधारण 'अ' अंदाजपत्रक, परिवहन सेवेचे 'ब' अंदाजपत्रक, जल - मल प्रवाह निधीचे क अंदाजपत्रक, वृक्ष प्राधिकरण अंदाजपत्रक, कर्ज निधी अंदाजपत्रक, सॅटेलाईट सिटी / स्मार्ट सिटी / विशेष योजना अंदाजपत्रक अशा वेगवेगळ्या भागात असलेल्या ₹ २४५७ कोटी ३४ लक्ष खर्चाच्या तरतूदी असलेला ₹ ३६ कोटी ६२ लक्ष शिलकेचा एकूण ₹ २४९३ कोटी ९६ लक्ष रकमेचा वास्तववादी व सर्व समाजघटकांना न्याय देण्याचा प्रयत्न करणारा हा अर्थसंकल्प असुन यावर दि. २३/०२/२०१५ ते २५/०२/२०१५ या कालावधीत सलगतेने पूर्णवेळ सर्वकष विचार विमर्ष करुन मा. स्थायी समितीने हा अर्थसंकल्प तयार केला असून तो मा. सर्वसाधारण सभेपुढे अंतीम स्विकृतीसाठी मी सादर करीत आहे.

**अर्थसंकल्पातील महत्वाच्या ठळक तरतूदी खालीलप्रमाणे.**

| | | |
|---|---|---|
| | जमा बाबी | |
| १) | अनुदान उत्पन्न | - ₹ ८६७ कोटी ४७ लक्ष २७ हजार |
| २) | कर्ज | - ₹ ४६८ कोटी |
| ३) | कराचे उत्पन्न | - ₹ ४४५ कोटी ३६ लक्ष २० हजार |
| ४) | प्रारंभिक शिल्लक | - ₹ २८३ कोटी ५९ लक्ष ७९ हजार |
| ५) | फी चे उत्पन्न | - ₹ २७ कोटी ३१ लक्ष ७७ हजार |
| ६) | इतर सेवांचे उत्पन्न | - ₹ १४३ कोटी ३३ लक्ष ४५ हजार |
| ७) | किरकोळ जमा | - ₹ २५८ कोटी ८७ लक्ष ६० हजार |
| | एकूण जमा | - ₹ २४९३ कोटी ९६ लक्ष ८ हजार |
| | खर्च बाबी | |
| ८) | आस्थापना खर्च | - ₹ १७२ कोटी ८१ लक्ष १ हजार |
| ९) | बांधील खर्च | - ₹ १८२ कोटी १९ लक्ष ७६ हजार |
| १०) | इतर आवश्यक खर्च | - ₹ २४० कोटी २७ लक्ष २१ हजार |
| ११) | इतर खर्च | - ₹ २४६ कोटी ९९ लक्ष ०६ हजार |
| १२) | विकास कामावरील खर्च | - ₹ १६१५ कोटी ०६ लक्ष ६१ हजार |
| | एकूण खर्च | - ₹ २४५७ कोटी ३३ लक्ष ६५ हजार |

१३) आपल्या महानगरपालिकेत समाविष्ठ भूतपूर्व ग्रामपंचायत क्षेत्रात करवाढ किंवा त्यांच्या अस्तित्वात असलेल्या करामध्ये कोणत्याही प्रकारची दरवाढ आपण केलेली नाही. पण महानगरपालिकेच्या इतर क्षेत्रासारख्या सेवा सुविधा आपण देत आहोत. त्या भागात तालुक्यातील इतर ग्रामपंचायतीपेक्षाही कमी कर आकारणी आहे ही बाब आम्ही आपल्या निदर्शनास आणून देत आहोत.

१४) आगामी ५ वर्षे कालावधीचा मालमत्ता कर व पाणीपट्टी आगाऊ भरणाऱ्या करदात्यांना कर रकमेवर १५% दराने प्रोत्साहनपर कर सवलत देणेची तरतुद केली आहे.

१५) मुदतीत मालमत्ता कर भरणाऱ्या मालमत्ता धारकांना व त्यांचे कुटुंबीयांना अपघाती विमा रकमेइतके थेट संरक्षणाचा लाभ देणेसाठी ₹ ७५ लक्ष तरतुद केली आहे.

१६) करदात्यांनी थकीत कर तात्काळ भरल्यास प्रोत्साहन म्हणून देणेसाठी विशेष बाब म्हणून दंड व व्याज माफीची अभय योजना लागू करण्यात आली आहे.

१७) सर्व मालमत्तांना कर आकारणी होणेसाठी प्रचलीत दर व कर आकारणी पद्धत विचारात घेऊन महानगरपालिकेमार्फत पडताळणी सापेक्ष, करदात्यांनी स्वयंमुल्य कर निर्धारण करुन त्यांना मालमत्ता कर भरणेची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

१८) विवीध बँकांच्या विवीध शाखांमध्ये सर्व प्रकारचे कर भरण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

१९) ऑनलाईन कर भरणा, भ्रमणध्वनीद्वारे करदात्यांना देय व भरणा केलेल्या कराचे संदेश देणेची व्यवस्था लवकरच उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

२०) वसई - विरार शहर महानगरपालिकेने स्थानिक संस्था कराचे दर इतर महानगरपालिकेच्या तुलनेने न्यूनतम स्तरावर ठेवले असून तो कर बँकेद्वारे भरण्याची सुविधाही उपलब्ध करुन दिली आहे.

२१) स्वातंत्र्य सैनिक, त्यांची विधवा पत्नी तसेच त्यांचे पुढील पहिल्या पिढीतील एका वारसास त्यांचे राहत्या निवासी सदनिकेस त्यांच्या वेळोवेळीच्या मागणीनुसार मालमत्ता करात १००% सुट आहे.

२२) आजी-माजी सैनिक अथवा त्यांचे अवलंबीतास मागणीनुसार मालमत्ता करात ५०% सुट आहे.

२३) महानगरपालिका क्षेत्रातील खाजगी शौचकुपांची प्रत्यक्ष सफाई सेवा वर्षातुन एकदा निशुल्क व तद्नंतर प्रचलित दराने आकारणी प्रस्तावित करण्यात आली आहे.

२४) शहरांतर्गत अग्निशमन सेवा निशुल्क करण्यात आली आहे.

२५) नवीन योजनांसाठी सद्याचे करदात्यावर कोणत्याही प्रकारचा बोजा न टाकता नव्याने वाढणाऱ्या लोकवस्तीसाठी तेथील विकासकांकडून विविध योजनांसाठी अंशदान मिळणेकरीता पाणीपुरवठा स्त्रोत विकास शुल्क आकारणी. फायर प्रोटेक्शन फी व विकास शुल्क आकारणी इ. नगररचना विभागामार्फत करण्यात येत आहे त्यामधून ₹ १४४ कोटी ४८ लक्ष उत्पन्न अपेक्षित आहे.

२६) सॅटेलाईट सिटी योजनेअंतर्गत मंजुर आकृतीबंधानुसार घनकचरा व्यवस्थापन व पहिल्या टप्प्यातील भुयारी गटार योजनेसाठी ₹ २९ कोटी १७ लक्ष ७८ हजार अनुदान प्राप्त झाले असुन ₹ ४५ कोटी ५ लक्ष ९५ हजार अनुदान अपेक्षित आहे. तसेच नागरी क्षेत्रातील उर्वरीत भागासाठी शासनाच्या निर्देशानुसार शिफारस झालेल्या प्रस्तावानुसार ₹ १२३२ कोटीच्या प्रकल्पापैकी प्रथम टप्प्यासाठी ₹ ३२१ कोटी ६४ लक्ष ८० हजार अनुदान अपेक्षित आहे.

२७) नो पार्कींग मधील वाहनांवर कारवाई करुन प्रशासकिय शुल्क वसुली व्यवस्था प्रभावीपणे राबवली जाणार आहे यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या वाहनांना प्रतिबंध होईल यापासून अपेक्षित उत्पन्न ₹ १७ लक्ष ठेवले आहे.

२८) तंबाखू जन्य पदार्थ शाळागृहांजवळ विकणेस शासकिय धोरणानुसार प्रतिबंध करुन सार्वजनीक ठिकाणी थुंकणे इ. अस्वच्छता निर्माण करणाऱ्या बाबींसाठी बिट मार्शल यांच्या नेमणूका करण्यात आलेल्या आहेत. त्याद्वारे प्रशासकीय शुल्क वसुलीचे अपेक्षित उत्पन्न ₹ ६० लक्ष ठेवण्यात आले आहे.

२९) i) "यु. आय. डी. एस. एस. टी / यु. आय. डी. एस. एस. एम. टी. / स्मार्ट सिटी / विशेष योजना" या योजनांअंतर्गत शासनाच्या निर्देशाप्रमाणे सादर केलेल्या प्रस्तावानुसार ₹ १४९५ कोटी खर्चाच्या पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेच्या कामासाठी तसेच उर्वरीत भुयारी गटार योजनेच्या ₹ १२३२ कोटी रकमेच्या प्रस्तावाच्या तीन टप्प्यांपैकी प्रथम टप्प्यात ₹ ५३७ कोटी १९ लक्ष ८० हजार अनुदान अपेक्षित आहे.

ii) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनेअंतर्गत मंजुर ₹ २९६ कोटी रकमेच्या, सुर्या विस्तारीत १०० दश लक्ष लिटर प्रतीदिन पाणीपुरवठा योजनेसाठी, ₹ १३४ कोटी ८९ लक्ष अनुदान मंजुर झाले आहे त्यापैकी ₹ ६७ कोटी ४४ लक्ष निधी प्रत्यक्ष प्राप्त होऊन कामास सुरुवात झाली आहे.

iii)सुजल निर्मल अभियानांतर्गत पाणीपुरवठा सुधारणा कामे योजनेतुन ₹ ७ कोटी ६८ लक्ष खर्चाच्या जल व उर्जा लेखा परिक्षणासाठी ₹ ५ कोटी ३७ लक्ष अनुदान अपेक्षित आहे.

iv)१८० दशलक्ष लिटर प्रतिदिन पाणी पुरवठा करणाऱ्या सुसरी धरणासाठी ₹ १६ कोटी व सातिवली राजीवली धरण योजनेस साठवण तलाव बांधकाम करण्यासाठी चाचणी निष्कर्ष, अन्वेषण, संकल्पन व वनजमिनी प्रस्ताव तयार करुन मंजुरी इ. प्राथमिक खर्चाकरीता प्रत्येकी ₹ १ कोटी प्रमाणे ₹ २ कोटी इतका निधी महानगरपालिकेने प्रत्यक्ष भरणा केला आहे व देहरजा योजनेसाठी एन. पी. व्ही. भरणेसह इतर कामाकरीता ₹ १५० कोटी इतकी रक्कम भरणा केली आहे.

सुर्या नदी पात्रात ५ ठिकाणी बंधारे बांधणे तसेच कवडास धरणाची उंची वाढवुन व गेट बांधून एकूण १०० दश लक्ष लिटर चा प्रकल्प राखुन ठेवणेसाठी प्रयत्न सुरु आहेत. यासाठी सर्व्हेक्षण व प्राथमिक खर्चासाठी ₹ २० लक्ष इतका निधी महानगरपालिकेने भरणा केला आहे.

प्रतिदिन २३ दश लक्ष लिटर पाणीपुरवठा उपलब्ध होऊ शकणारे राजीवली सातीवली धरण व प्रतिदिन ७० दश लक्ष लिटर पाणीपुरवठा उपलब्ध होऊ शकणारे कामण धरण, १२ दश लक्ष लिटर प्रतिदिन पाणीपुरवठा करणारे खोलसापाडा धरण तसेच धामणी व खडकवली धरणावरील योजनाचा पाठपुरावा करुन एकूण ४१५ दश लक्ष लिटर पाणीस्त्रोत उपलब्ध करणेसाठी प्रयत्न सुरु आहेत.

v) मासवण, सायवन, मेढा, पांढरतारा व खानीवडे हे बंधारे हस्तांतरणासाठी सन २०१४-१५ व सन २०१५-१६ मध्ये प्रतिवर्षी ₹ २५ लक्ष इतकी तरतूद केली आहे.

vi)पाणीपुरवठा प्रकल्प व जागामोजणी सर्व्हेक्षण खर्चासाठी सन २०१४-१५-१६ मध्ये प्रतिवर्षी ₹ ५० लक्ष इतकी तरतूद केली आहे.

vii)अंतर्गत जलवाहीनी व्यवस्थेसाठी स्वनिधीतुन सन २०१४-१५-१६ मध्ये प्रतिवर्षी ₹ २० कोटी इतकी स्वतंत्र तरतूद केली आहे.

viii) सार्वजनिक विहीर सफाई व गाळ काढण्यासाठी सन २०१४-१५-१६ मध्ये प्रतिवर्षी ₹ ५७ लक्ष तसेच कुपनलीका खोदाईसाठी सन २०१४-१५-१६ मध्ये प्रतिवर्षी ₹ ३ कोटी ७० लक्ष इतकी तरतूद केली आहे.

ix) पाणीपुरवठा योजनेच्या कर्ज परतफेडीसाठी सन २०१४-१५ मध्ये ₹ १५ कोटी व सन २०१५-१६ मध्ये ₹ २६ कोटी २५ लक्ष ९८ हजार इतकी तरतूद केली आहे.

पाणीपुरवठा सेवेसाठी सन २०१४-१५ मध्ये ₹ २९३ कोटी ९७ लक्ष ६८ हजार व सन २०१५-१६ मधे यु. आय. डी. एस. एस. टी / यु. आय. डी. एस. एस. एम. टी. / स्मार्ट सिटी / विशेष योजना तरतूदी व्यतिरीक्त ₹ ४९२ कोटी ३३ लक्ष ४० हजार तरतुद केली आहे.

३०) महानगरपालिकेच्या रुग्णालयीन सेवेचा दर्जा सुधारणेसाठी विशेष भर देण्यात आला असुन, नालासोपारा येथील रुग्णालय खाजगी संस्थेमार्फत चालवणेसाठी अनुदान देणेची तरतुद, महानगरपालिका क्षेत्रातील रुग्णांसाठी श्वान दंश व सर्प दंश इंजेक्शन मोफत देणेची तरतूद, तसेच महानगरपालिकेच्या रुग्णालयात जेनेरीक मेडीसीन उपलब्ध करणेची तरतुद. अंमली पदार्थांचे सेवन करणाऱ्या व्यक्तींसाठी समुपदेशन करणे व जनजागृती करणेची तरतूद इत्यादीसह रुग्णालय व्यवस्थापनासाठी ₹ ३४ कोटी ९६ लक्ष ६५ हजार इतकी तरतूद करण्यात आली आहे.

महानगरपालिकेचे कर मुदतीत भरणाऱ्यांना हेल्थ कार्ड उपलब्ध करुन देऊन महानगरपालिकेच्या रुग्णालयात रक्त तपासणी, ई.सी.जी, एक्सरे, इ. तपासणीसाठी सर्वसामान्यांना ५०% तसेच अंध, अपंग आणि महिला व बालकांना १००% सवलत दिली जात आहे.

३१) नियमीत रस्ते, गतिरोधक, गटर, तलाव, सार्वजनिक ठिकाणी जागेच्या उपलब्धतेनुसार शौचालये व मुतारी बांधकामे यासह बहुमजली पार्किंग योजना, गोगटे सॉल्टच्या जागेतील विकास, रो-रो फेरी सेवा, बौद्धस्तुप प्रवेशद्वार सुशोभिकरण, नालासोपारा येथील बौद्ध स्तुपापासुन २ कि.मी. च्या परिसरात तसेच वसई किल्ल्यालगतच्या २ कि.मी.च्या परिसरात स्वतंत्र व्यवस्थेअंतर्गत थ्री डी चीत्रफीतीद्वारे माहिती देण्यासाठी चलचित्रपट दर्शवणे, बैठक व्यवस्था, वाचनालय व्यवस्था करणे 'माही वसई' या प्रदर्शनात प्रसिद्ध केलेल्या पारंपारिक वसईचे दर्शन घडविणारे देखावे व वस्तुंचे जतन करण्यासाठी वस्तुसंग्रहालय उभारणे इत्यादी साठी पर्यटन व श्रीक्षेत्र विकास तसेच ऐतिहासीक मालमत्ता संवर्धन विषयक तरतुद, बहुउद्देशीय इमारती इ. सह आरक्षीत जागांचा भुसंपादनासह विकास, खुले व बंदीस्त नाट्यगृह, प्रभाग समिती 'क' मध्ये सर्वोदय वसाहत येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतीक भवन उभारणे , बंदर विकास कार्यक्रमांतर्गत शितगृह व्यवस्था, बर्फ कारखाना, मासळी सुकविण्यासाठी चौथरा बांधकाम, जेट्टीच्या जोडरस्त्याचे काँक्रीटीकरण, उतरता धक्का बांधणे, समुद्रकिनारी संरक्षक भिंती व धुपप्रतिबंधक बंधारा, मासेमारी नौकांचे यांत्रीकीकरण व इतर विकास कामांसाठी ₹ १ हजार १२ कोटी ५३ लक्ष ८१ हजार इतकी तरतूद केली आहे.

३२) आगाशी, बोळींज व नालासोपारा येथे प्रगतीपथावर असलेल्या मार्केट विकासासाठी मत्स्यविकास महामंडळाकडून ₹ ६ कोटी ८२ लक्ष अनुदान मंजुर झाले असुन त्यापैकी ₹ २ कोटी २१ लक्ष ९४ हजार इतकी रक्कम प्रत्यक्ष प्राप्त झाली आहे. सन २०१४-१५-१६ मध्ये ₹ ४ कोटी ६० लक्ष ६ हजार अनुदान अपेक्षित आहे.

३३) मोनोरेल/मेट्रो रेल प्रकल्पाच्या सर्व्हेक्षण व इतर अनुषंगीक प्राथमिक कामांसाठी ₹ २ कोटी तरतूद केली असुन ₹ २००० कोटी खर्चाच्या रिंगरोड प्रकल्पासाठी स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत ₹ ७५ कोटी अनुदान व ₹ ७५ कोटी कर्ज निधीसह प्रथम टप्प्यात ₹ १६९ कोटी ४५ लक्ष खर्च अपेक्षित आहे.

विकास आराखड्यात प्रस्तावित असलेल्या ५ उड्डाणपूलांसह सदरकामासाठी एम. एम. आर. डी. ए. कडे प्रकल्प अहवाल सादर केला असुन सदर कामाची प्रक्रीया सुरु आहे.

३४) एकात्मीक तलाव संवर्धन योजनेअंतर्गत तलाव शृंखला संवर्धनानुसार (चेन ऑफ लेक) ₹ ३५ कोटी अनुदानासह ₹ ५१ कोटी ९३ लक्ष ८० हजार खर्च अपेक्षित आहे.

३५) शितगृहाच्या उपलब्धतेसह ओलेमासळी मार्केट, मटन मार्केट, सुकी मासळीमार्केट, भाजीमार्केट, फुलमार्केट, इ. मार्केट व बहुउद्देशीय मंडई विकासासाठी सन २०१४-१५ मध्ये ₹ ३ कोटी ४१ लक्ष ५५ हजार व सन २०१५-१६ मध्ये ₹ ६ कोटी १७ लक्ष ५० हजार इतकी तरतूद केली आहे.

३६) कृत्रीम तलाव निर्मीती व इतर तलाव विकासासाठी ₹ ५१ कोटी ९३ लक्ष ८० हजार तरतूद केली असुन याद्वारे गौरी गणपती विसर्जन, देविच्या मुर्तींचे विसर्जन, छटपुजा व्यवस्था इत्यादी सर्वधर्मीयांच्या देव देवतांच्या मुर्तीचे विसर्जन व पुजाविधीसाठी तलावासह समुद्र किनारी चौपाटीवर विशेष व्यवस्था दर वर्षी केली जाते.

३७) आंतरशालेय कला क्रीडा महोत्सव, वसई तालुका कला क्रीडा महोत्सव समितीसह इतर क्रीडासंस्थांना अनुदान, महापौर मॅरेथॉनचे आयोजन, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर शासनमान्य स्पर्धासाठी शालेय विद्यार्थ्यांचे संघ पाठवणेसाठी प्रायोजकत्व स्विकारणे, वर्ल्डकप, ऑलिम्पीक एशियाड, राष्ट्रकुल, राष्ट्रीय व इतर तत्सम स्पर्धामध्ये निवड झालेल्या खेळाडूंना प्रोत्साहनपर प्राथमिक खर्चासाठी आर्थिक मदत, तसेच यशस्वी स्पर्धकांचा पारितोषीक देऊन सन्मान, चिमाजी आप्पा मैदान विकास, बोळींज येथील मैदान विकास, वालिव येथील हितेंद्र आप्पा मैदान विकास, पापडखिंड धरणाजवळील जागेत ४०० मीटर ट्रॅक, ॲथेलिक्स् खेळांच्या सुविधा, २०० विद्यार्थी व विद्यार्थीनींसाठी वसतीगृह अशा सुविधा निर्माण करणे, प्रत्येक प्रभागात सर्व खेळांसाठी सुसज्ज क्रीडांगणे तयार करणे, प्रत्येक प्रभागात खुली किंवा बंदिस्त प्रेक्षागार तयार करणे, वसई - विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील होतकरु खेळाडूंना ॲथलेटिक्स् खेळाचे प्रशिक्षण (स्पोर्टस् ओथोरिटी ऑफ इंडीया) यांच्याकडे पाठविण्यासाठी त्यांच्या प्रवास, भोजन व सकस आहार यावर होणारा खर्चासाठी अर्थसहाय्य, वसई तालुका कला - क्रीडा विकास मंडळ या संस्थेच्या सहाय्याने महानगरपालिका क्षेत्रात विभागावर कला -

क्रीडा महोत्सव, महापौर मॅरेथॉन, विविध खेळांच्या राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन करणे, महापालिका क्षेत्रात क्रीडा प्रबोधिनी सुरु करुण्यास चालना देणे व यासाठी अर्थसहाय्य करणे, शैक्षणिक संस्थांना क्रीडा साहित्याचा पुरवठा करणे. शालेय क्रीडा स्पर्धांना प्रोत्साहन देण. इ. क्रीडा विषयक कार्यक्रमासाठी ₹ २३ कोटी २८ लक्ष ७५ हजार तरतुद केली आहे.

३८) शाळा, महाविद्यालय व ग्रंथालयांनी त्या - त्या संस्थेबाहेरील युवकांसाठी स्पर्धा परिक्षेची पुस्तके उपलब्ध करुन देऊन अभ्यासिकेची व्यवस्था केल्यास अशा संस्थांना थंड पिण्याच्या पाण्याची यंत्र, विद्युत जनित्र / इन्व्हर्टर इ. साधनसामुग्री पुरविणेची तरतूद केली आहे तसेच संस्थेबाहेरील विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका उपलब्ध करणाऱ्या मराठी, हिंदी, गुजराथी, उर्दू व अन्य भारतीय भाषिक माध्यमाच्या शाळांना सर्व शालेय विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त थंड पीण्याच्या पाण्याची यंत्रे, क्रीडासाहित्य, प्रयोग शाळेतील साहित्य, विद्युत जनित्र / इन्व्हर्टर / सौर उर्जा व्यवस्था इ. साधन सामुग्री पुरविणेसाठी ₹ ८३ लक्ष इतकी तरतूद केली असुन प्रभाग स्तरावर वाचनालये निर्मिती व ई-ग्रंथालय उपलब्ध करणेसह एकूण वाचनालय व अभ्यासिका व्यवस्थेसाठी ₹ १ कोटी ४८ लक्ष ६८ हजार इतकी तरतूद केली आहे. खाजगी ग्रंथालयांना त्यांचे वर्गवारीप्रमाणे महानगरपालिकेमार्फत संस्था अनुदानाच्या तरतूदीअंतर्गत अनुदान देण्यात येत आहे.

३९) जिल्हा परिषदेच्या शाळा ताब्यात घेणे, शाळागृहांकरीता साधनसामुग्री खरेदी करणे व शाळागृहे ताब्यात येईपर्यंत शाळागृहांची दुरुस्ती देखभाल इ. साठी १ कोटी ३५ लक्ष तरतूद केली आहे.

४०) प्राथमीक व माध्यमिक शालेय शिष्यवृत्ती व स्पर्धा परिक्षेतील सर्व प्रवर्गातील यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषीके देऊन गुणगौरव तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धा परिक्षेस पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांना अपेक्षित खर्चानुसार अर्थसहाय्य देणेसाठी तरतूद ₹ ५ लक्ष तरतूद केली आहे.

४१) शालांत माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परिक्षेतील विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या पहिल्या १० विद्यार्थ्यांपैकी प्रथम क्रमांकास ₹ १५ हजार, द्वितीय क्रमांकास ₹ १० हजार, तिसऱ्या क्रमांकास ₹ ५ हजार, व अ.क्र. ४ ते १० विद्यार्थ्यांना प्रत्येकी ₹ २ हजार, प्रमाणे पारितोषीक देणे व शिष्यवृत्ती देणे तसेच शालेय विद्यार्थ्यांना सायकलीचे वाटप इत्यादीसाठी युवक कल्याण योजनेअंतर्गत ₹ २ कोटीची तरतूद केली आहे.

४२) वनीकरण कार्यक्रमांतर्गत आतापर्यंत ४ लक्ष ६० हजार झाडे लावणेत आली असुन येत्या वर्षात २ लक्ष ५० हजार विविध २८ जातींच्या रोपांची लागवड करणेची तरतूद आहे. महानगरपालिका क्षेत्रातील इच्छुक व्यक्ती व संस्थांना मागणीनुसार बहावा, बकुळ, डाळींब, सिताफळ, सफेद अर्जुन, सुरु इ. रोपे मोफत उपलब्ध करुन रोपण व संवर्धनासाठी प्रती रोपास रोपाच्या जातीप्रमाणे वार्षिक ₹ २००/- ते ₹ ५००/- प्रमाणे ३ वर्षे अनुदान देणेची तरतूद केली आहे.

वृक्ष प्राधिकरणाच्या कामांसाठी सन २०१४-१५-१६ मध्ये एकूण ₹ ३६ कोटी ७ लक्ष ७४ हजार इतकी तरतूद करण्यात आली आहे.

४३) वस्ती तेथे बससेवा या संकल्प पुर्तीची मुहुर्तमेढ रोवली असुन परिवहन सेवेतील ११९ बसेसद्वारे सुरळीत सुरु झाली आहे.

अन्य महानगरपालिकांची परिवहन सेवा तुटीत चालत असताना आपल्या परिवहन सेवेचा महानगरपालिकेवर कोणत्याही प्रकारचा खर्चभार नसुन उलटपक्षी रॉयल्टी उत्पन्न प्राप्त होत आहे त्यामुळे शासनाच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे बसेस देखभाल दुरुस्ती व प्रवास भाडे वसुली यासाठी स्वतंत्र अभिकर्ता नेमून कार्यवाही न करता सद्यस्थितीत सुरु असलेल्या पद्धतीनेच परिवहन सेवा सुरु ठेवण्याचा महानगरपालिकेचा निर्णय असुन आपली यशस्वी उल्लेखनीय परिवहन सेवा भविष्यात इतरांसाठी पथदर्शी ठरत असल्याचे जाणकारांचे अभिप्राय आहेत.

केंद्र शासनास सादर केलेल्या जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थापन महाअभियान योजनेअंतर्गत अंतिम सुधारीत प्रस्तावामधील ३४६ बसेस पैकी २२० बसेस लवकरच दाखल होणार आहेत हे जाहीर करताना मला आनंद होत आहे.

डेपो बांधकामासह इतर व्यवस्थेसाठी ₹ १९३ कोटी २२ लक्ष प्रकल्प खर्चास शासनाची मान्यता प्राप्त झाली असुन यासाठी ₹ १४४ कोटी २५ लक्ष अनुदान मंजुर झाल्याने परिवहन सेवेस बळकटी येणार आहे.

संपुर्ण शहरात आवश्यक त्या सर्व मार्गीकांवर परिवहन सेवा करण्याचा मानस आहे.

ऐतिहासीक, सांस्कृतीक वारसा लाभलेल्या आपल्या या महानगराचे दर्शन घडवणारी पर्यटकांचे आकर्षण ठरुन स्थानिकांना उत्पन्नाचे साधन निर्माण करुन देणारी 'वसई दर्शन' बससेवा देखील लवकरच सुरु करण्याचा इरादा असून लांब पल्ल्याच्या मार्गीकादेखील सुरु करण्याचा मानस आहे.

सद्यस्थितीत सुरु असलेल्या महानगरपालिकेच्या परिवहन सेवेच्या बसेसमधून प्रवास करणाऱ्या शालेय विद्यार्थी ह्यांना ६६.६६%, ज्येष्ठ नागरिकांना ५०%, अंध व अपंग व्यक्तिंना सोबत्यासह प्रवास व प्रवास भाड्यामध्ये ५०% सुट, महानगरपालिकेच्या संभाव्य प्रस्तावित धोरणानुसार प्रायोगीक तत्वावरील विनातिकीट परिवहन सेवा व इतर एकूण खर्चासाठी ₹ ३५ कोटी २३ लक्ष ८४ हजार महानगरपालिका अंशदानाची तरतूद असलेला परिवहन उपक्रमासाठीचा ₹ १४९ कोटी ०७ लक्ष ६९ हजार रकमेचा 'ब' अर्थसंकल्प मंजूर करावा अशी शिफारस आहे.

४४) समाजातील सर्व घटकांच्या कल्याणासाठी योजनांचे स्वरुप व आवश्यकता विचारात घेऊन महिला व बाल कल्याण योजना तरतूदी, जेष्ठ नागरीकांसाठीच्या तरतूदी, युवक कल्याण कार्यक्रमाच्या तरतूदी, रुग्णालय व्यवस्थापनाच्या तरतूदी, अंध, अपंगासाठीच्या तरतूदी, यामधून महिला व बाल कल्याण समितीमार्फत खालील योजना अंमलबजावणीच्या तरतूदी केल्या आहेत.

i) विधवा, निराधार, घटस्पोटित, परितक्त्या महिलांसाठी विविध योजना -

- विधवा, निराधार, घटस्पोटित, परितक्त्या महिलांच्या मुलांसाठी शैक्षणिक अर्थसहाय्य.
- विधवा, निराधार, घटस्पोटित, परितक्त्या महिलांच्या मुलीच्या लग्नासाठी अर्थसहाय्य.
- एकाकी जेष्ठ महिलांना मासिक अर्थसहाय्य.

ii) अंध - अपंग, विशेष बालकांसाठी योजना -

- अंध - अपंग, मुक कर्णबधीर मुलांना शैक्षणिक अर्थसहाय्य.
- अंध - अपंग मुलीच्या विवाहासाठी अर्थसहाय्य.
- ७५% वा त्याहून अधिक अपंगत्व असणाऱ्या विद्यार्थी व महिलेस मासिक अनुदान.
- ४५% ते ७५% दरम्यान अपंगत्व असणाऱ्या महिलांना स्वयं रोजगारासाठी अनुदान.
- गतिमंद, मतिमंद विशेष बालकांसाठी मासिक अनुदान.
- व्यवसाय प्रशिक्षण घेतलेल्या गतिमंद, मतिमंद मुलांना स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्य.
- ज्या मुलीचे पालक अंध अथवा अपंग असतील त्या मुलींना विवाहासाठी अर्थसहाय्य.

iii) महिला सक्षमिकरणासाठी प्रशिक्षण, महिला बचत गट नोंदणी, बचत गटास अर्थसहाय्य, बाजारपेठ आयोजन, उद्याजक मेळावे.

iv) विद्यार्थ्यांसाठी विविध योजना -

- जि.प. शाळेमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थांना शालेय साहित्य पुरवठा
- अंगणवाडीत जाणाऱ्या ३ वर्षावरील मुला मुलींना साहित्य पुरवठा.
- इयत्ता ५ वी ते १० वी मधील मुलांसाठी मोफत बस पास योजना.
- इयत्ता ८ वी ते १० वी मधील विद्यार्थ्यांनासाठी सायकल वाटप.
- अनाथ, निराधार बालकांसाठी व महिलांसाठी शैक्षणिक अर्थसहाय्य.
- अनाथ, निराधार मुलांना १४ वर्षापर्यंत महिला बाल कल्याण योजनेतुन व तद्नंतर युवक कल्याण योजनेतुन शैक्षणिक अर्थसहाय्य.

v) वैशिष्ठपुर्ण योजना

- महिला व मुलींना महिला बाल कल्याण योजना तरतुद, युवकांना युवक कल्याण तरतुद व जेष्ठांना जेष्ठ नागरीक कल्याण तरतुद यामधून डायलेसीस उपचारासाठी अर्थसहाय्य देण्यात येत असुन यासाठी सर्व रुग्णालयांकडून याबाबतची दर पत्रके मागवुन त्यापैकी प्रतीरुग्ण कमाल ₹ ७५०/- पर्यंत दर घेणाऱ्या रुग्णालयांना प्रतीरुग्ण ₹ ३५०/- इतका खर्च महानगरपालिकेमार्फत अनुदान स्वरुपात दिला जात आहे.

  डायलेसीस उपचारासाठी महानगरपालिका ठरवुन देईल अशा दराने डायलेसीस करणाऱ्या रुग्णालयांना महानगरपालिकेमार्फत मशिन पुरविणेची तरतूद रुग्णालय व्यवस्थापनांतर्गत आहे.

- सामुदायिक विवाह सोहळ्यात विवाह करणाऱ्या वधु - वरांस महिला बाल कल्याण व युवक कल्याणकारी योजनेतुन अर्थसहाय्य.
- अनाथ / निराश्रीत बालकांस कायदेशिररित्या दत्तक घेणाऱ्या पालकांस प्रोत्साहनात्मक अनुदान
- कॅन्सरग्रस्त मुली, बालके व महिलेस उपचारासाठी अर्थसहाय्य.
- कॅन्सरग्रस्त युवक व जेष्ठांना युवक कल्याण व जेष्ठ नागरीकांचे तरतुदीमधून महिला बाल कल्याण समितीमार्फत अर्थसहाय्य.
- ज्या महिलेचे पती व्याधीग्रस्त असुन अंथरुणावर खिळलेले आहेत अशा महिलेल्या मुलांना शैक्षणिक अर्थसहाय्य.
- एक मुलगी असताना कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केली असता ₹ १५ हजार व दोन मुली असताना शस्त्रक्रिया केली असल्यास प्रत्येक मुलीस ₹ ५ हजार इतके अनुदान त्या मुलीचे नावे १८ वर्ष कालावधीच्या मुदत ठेव प्रमाणपत्राद्वारे वितरीत करणे.
- एच. आय. व्ही. बाधीत कुटुंबास उदरनिर्वाह व उपचारासाठी महिला व बाल कल्याण समितीमार्फत अर्थसहाय्य देणे.
- एड्स ने मृत्यू पावलेल्या व्यक्तीच्या विधवा पत्नीस वैयक्तिक अर्थसहाय्य करणे.
- मल्टी ड्रग रेजीस्टन्स व क्षयरोग बाधीत रुग्णांसाठी सहाय्यकारी विविध योजनांकरीता तरतूद.

vi) इतर योजना -

- बालक मेळावे.
- कला महोत्सव.
- तिळगुळ समारंभ.
- आरोग्य शिबिर आयोजन.
- बालभवन पाळणाघर तत्सम नोंदणीकृत संस्थांना अनुदान वाटप.
- अनाथ, निराधार मुलींच्या उपजिवीकेसाठी व विवाहासाठी अर्थसहाय्य.
- अनाथ, निराधार मुलांना युवक कल्याण योजनेअंतर्गत उपजिवीकेसाठी व विवाहासाठी अर्थसहाय्य.
- विशेष बालकांसाठी कार्य करणाऱ्या संस्थांना अनुदान देणे,
- नोकरदार महिलांसाठी वसतीगृह,
- निराधार महिलांसाठी तात्पुरता निवारा केंद्र व जेष्ठ महिलांसाठी वृद्धाश्रम निर्मीती व त्यांचेसाठी कार्य करणाऱ्या संस्थांना अर्थसहाय्य देणे,
- कुपोषित माता व बालकांसाठी सकस आहार,
- बालकांच्या विकासासाठी अन्य आवश्यक असे कार्यक्रम,
- महानगरपालिका रुग्णालयातील प्रसुती विभागातील रुग्णांना पोषण व अल्पोपहार भत्ता देणे,
- जननी शिशु सुरक्षा योजनेच्या लाभासह प्रसुत महिलांना रुग्णालयातून डिस्चार्ज दिल्यानंतर ₹ १६००/- इतका पोषण व आरोग्य भत्ता देणे,
- महिलांसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजनासाठी सभागृह व व्यवसायासाठी गाळे असलेली महानगरपालिका मालकीची बहुउद्देशिय इमारत प्रभाग स्तरावर मोक्याच्या ठिकाणी उपलब्ध करुन देणे,
- महानगरपालिकेच्या रुग्णालयात वैद्यकिय तपासण्यासाठी महिला व बालकांना १००% सवलत देणे.
- विधवा परितक्त्या महिलांसाठी कार्य करणाऱ्या संस्थांना अनुदान देणे,
- महिला व मुलींसाठीच्या आश्रमांना अनुदान,

- अनाथ आश्रमांना अनुदान,
- बालचित्रपट महोत्सव,
- स्त्रीरोग चिकित्सा शिबीर,
- मुलींचे शाळा गळतीचे प्रमाण थांबवण्यासाठी प्रोत्साहन अनुदान,
- उत्कृष्ट कामाबद्दल महिलांचा गौरव,
- महिलांना त्यांचे कायदेशिर अधिकार व महिलांवरील अत्याचारांसबधी समुपदेशन करणे.
- कुष्टरोग बाधीत पुरुष रुग्णांना कुष्टरोग निर्मुलन कार्यक्रमांतर्गतच्या तरतूदीमधून तसेच कुष्टरोग बाधीत महिला व मुलींना महिला बाल कल्याण योजनेअंतर्गत, उपचार व पोषण भत्ता देणे.
- नवजात रुग्ण बालकांस आवश्यक सुविधा पुरविणेसाठी अर्थसहाय्य देणे.
- महिला व बाल कल्याण योजनेच्या तरतूदी अंतर्गत अंगणवाड्यांसाठी वाढीव भाडे देणे.
- महिला व बाल कल्याण योजनेअंतर्गत महानगरपालिका रुग्णालयात नोंदणी केलेल्या गर्भवती महिलांसाठी व प्रसुत महिलांसाठी रुग्ण वाहिकेचा खर्च करणे.

यासाठी २०१५-१६ मधे ₹ २६ कोटी ९६ लक्ष ७१ हजार इतकी तरतूद करण्यात आली आहे.

४५) जेष्ठ नागरीकांसाठी इतर विकास कामांच्या तरतूदी अंतर्गत स्कायवॉक तसेच उड्डाणपुलाजवळ सरकते जिने व उद्वाहन व्यवस्था, उद्यान व्यवस्थेच्या तरतूदीअंतर्गत नाना-नानी पार्क, सार्वजनीक व मोक्याचे ठिकाणी बैठक व्यवस्था, परिवहन सेवेत ५०% प्रवास भाडे सवलत, संस्था अनुदानाअंतर्गत जेष्ठ नागरीकांमार्फत चालवल्या जाणाऱ्या संस्थांना त्यांचे कार्यक्रमांसाठी अनुदान, वृद्धाश्रमांना अनुदान, जेष्ठ नागरीकांच्या नोंदणीकृत संस्थांना अनुदान तसेच रुग्णालय व्यवस्थापनाअंतर्गत आरोग्य चिकीत्सा व डायलेसीस उपचारासाठीच्या तरतुदी अन्यत्र नमुद प्रमाणे असून विरंगुळा केंद्र व वृद्धाश्रमाचे व्यवस्थापनासाठी ₹ ५१ लक्ष इतकी स्वतंत्र तरतूद केली आहे. तसेच जेष्ठ नागरीकांमार्फत चालविल्या जाणाऱ्या नोंदणीकृत संस्थांना उद्यान देखभालीचा ठेका घेण्यासाठी प्राधान्य दिले जाणार आहे.

४६) मच्छिमार बोटींसाठी जाळ्या, प्रथमोपचार पेटी (मेडिकल किट), लाईफ जॅकेट, पिण्याचे पाणी शुध्द राहणेसाठी रसायन मिश्रीत गोळ्या, सिग्नल लाईटसाठी बॅटरी व इतर आवश्यक साहित्य पुरविणे, मच्छिमारांना अपघाती विमा रकमेइतके थेट संरक्षणाचा लाभ देणे, नैसर्गिक व इतर

आपत्तीकाळात नियंत्रण व मदतीसाठी संबंधीत अभिकरणासमवेत करार करुन पोलिस मदतीसह हेलिकॅप्टर भाड्याने घेणे इ. मच्छिमारांसाठी कल्याणकारी योजना राबविणे यासाठी ₹ ३ कोटी इतकी तरतुद केली आहे.

४७) शेतकरी व बागायतदारांसाठी साहित्य पुरवठा, इत्यादी शेती विकास कार्यक्रमासाठी ₹ ५ कोटी विशेष तरतूद केली आहे.

४८) नागरी गरीब घटकासाठी स्वतंत्र वैद्यकिय शिबीर, अपघाती विमा संरक्षण, दलित वस्ती सुधारणा व राजीव आवास योजनेचा लाभ, मच्छिमारांसाठीच्या योजना, मागासवर्गीय कल्याणकारी योजना, नागरी गरीब वस्तीतील विकास कामे शासकिय अनुदान निधीतून आदिवासी उपाययोजना वसतीगृह इ. बाबींसाठी "पी" बजेट अंतर्गत ₹ ६२ कोटी ३१ लक्ष १४ हजार इतकी तरतूद केली आहे.

४९) ट्रांझीट कॅम्पसह आपत्कालीन परिस्थितीत आवश्यक मदत उपलब्ध करणेसाठी ₹ १ कोटी १८ लक्ष ५० हजार इतकी तरतूद केली आहे.

५०) रात्रनिवारा शेडसाठी ₹ १ कोटी इतकी तरतुद केली आहे.

५१) राजीव आवास योजनेअंतर्गत शहरी गरीब लोकांच्या ₹ ६० कोटी खर्चाच्या गृहनिर्माण प्रकल्पासाठी सन २०१४-१५-१६ मध्ये प्राथमिक टप्प्यात ₹ ५ कोटी खर्चाची तरतूद करण्यात आली आहे.

५२) शुन्य कचरा अभियानांतर्गत सार्वजनिक ठिकाणी व रस्त्यावर ५०० मीटर क्षेत्रासाठी एक कामगार २ पाळ्यांमध्ये नियमीत उपलब्ध करणे व केरकचरा उचलणे, स्वच्छ भारत अभियांन धर्तीवर अथवा या योजनेअंतर्गत स्वच्छता विषयक जनजागृतीसह भांडवली कामांपर्यंत सर्व योजना प्रभावीपणे राबविणेसाठी इत्यादी साफसफाई व्यवस्थेसाठी एकूण ₹ १३६ कोटी १२ लक्ष २५ हजार इतकी तरतूद केली आहे.

५३) नालेखोदाईसाठी ₹ ४ कोटी ७५ लक्ष तरतूद केली आहे.

५४) कोंडवाडा व मादी श्वान निर्बिजीकरण केंद्र उभारणेसह व्यवस्थापनासाठी ₹ ७७ लक्ष ९० हजार इतकी तरतूद केली आहे.

५५) अपारंपारीक उर्जा स्त्रोत निर्मिती प्रकल्पासह एल. इ. डी दिवे व इतर दिवाबत्ती व्यवस्थेसाठी ₹ २४ कोटी ९७ लक्ष २४ हजार खर्च अपेक्षित आहे व त्यासाठी तरतूद केली आहे.

५६) बालभवन संस्था, ग्रंथालये, जेष्ठ नागरीकांच्या विश्वस्त नोंदणीकृत संस्था तसेच शैक्षणिक व सामाजिक कार्य करणाऱ्या इतर विश्वस्त नोंदणीकृत संस्थांना अनुदान देणेकामी संस्था अनुदानाअंतर्गत तरतूद ₹ २ कोटी तरतुद केली आहे.

५७) महापौर सहायता निधीसाठी ₹ २५ लक्ष अनुदानाची तरतूद केली आहे.

५८) उद्यान, बालोद्यान, वनस्पतीउद्यान यासह विविध उद्याने विकसीत करुन देखभाल दुरुस्तीसाठी ₹ ११ कोटी ४५ लक्ष ५५ हजार इतकी तरतूद केली आहे.

५९) सर्व धर्मिय संस्कृती व इतिहास जोपासना करणाऱ्या कार्यक्रमांचे आयोजन इत्यादीसाठी सत्कार व उत्सव समारंभाअंतर्गत ₹ २ कोटी इतकी तरतूद केली असून तसेच असे कार्यक्रम राबविणाऱ्या संस्थाना, संस्था अनुदानांतर्गत अनुदान देणेची तरतूद केली आहे.

६०) विकास आराखड्यातील विविध अत्यावश्यक ठिकाणी रेल्वे व रस्ते उड्डाणपुल तसेच पादचारी पुल निर्मीतीसाठी ₹ १० कोटी ६९ लक्ष तरतूद केली आहे.

६१) यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडील सेवानिवृत्त अधिकाऱ्याची सल्लागार म्हणुन नियुक्ती करुन त्यांचे विशेष सल्यानुसार व नगररचना अधिकाऱ्यांचे शिफारशीनुसार जलद कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

६२) विविध रस्ते व सार्वजनीक ठिकाणी दिशादर्शक व स्थळ दर्शक फलक लावुन महानगरपालिकेने केलेल्या कामाच्या ठिकाणी तपशिल नमुद करणारे फलक लावणे इ. साठी ₹ ७ लक्ष तरतूद केली असुन प्रसिद्धी खर्च तरतूद ₹ २ कोटी ४३ लक्ष ७५ हजार मधून महानगरपालिकेच्या विविध योजना जनतेपर्यंत पोहचवण्यासाठी आवश्यक तरतूद केली आहे.

६३) शहरातील सार्वजनीक महत्वाचे ठिकाणी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे व सुरक्षा यंत्रणेसाठी ₹ १ कोटी ५५ लक्ष तसेच पोलिस संरक्षणासह महिला सुरक्षा वाहन व सुरक्षा रक्षक व्यवस्थेसाठी ₹ ९ कोटी ४५ लक्ष इतकी तरतूद केली आहे.

६४) इ-गव्हर्नन्स अंमलबजावणीसह स्वतंत्र संगणकीय व्यवस्थापन केंद्राची निर्मीती करुन संपुर्ण शहर वासीयांसाठी "वाय.फाय" सेवा उपलब्ध करणे यासाठी ₹ ५ कोटी इतकी तरतूद केली आहे.

६५) सभागृह व पत्रकार भवनासह नगरभवन इमारत बांधकाम, प्रशासकीय इमारती नुतनीकरण, आयुक्त निवास, महापौर निवास, यासाठी ₹ २ कोटी ५० लक्ष इतकी तरतुद केली असुन खुली व बंधीस्त नाट्यगृहे व सभागृह बांधकामासाठी ₹ २ कोटी ४५ लक्ष इतकी तरतूद केली आहे.

६६) महानगरपालिका क्षेत्रातील दहन / दफन भुमीमध्ये, मागणीनुसार सर्व धर्मीयांचे दहन विधीसाठी मोफत लाकडे, तसेच दफनभुमीमध्ये दफन संस्कारासाठी ₹ १०००/- ठोक अनुदान देण्यात येत आहे.

६७) पर्यावरण संरक्षणासाठी विद्युत दाहिनी व गॅस दाहिनीचा वापर करणेस प्रोत्साहीत करण्यासाठी

मयत व्यक्तीचे निकटतम् नातेवाईकास मागणीनुसार ठोक ₹ १०००/- इतके तात्काळ अर्थसहाय्य देणेची तरतूद करण्यात आली आहे तसेच सर्वधर्मीयांच्या दफन भुमीसाठी भुसंपादनासह अस्तित्वातील दहन दफन भुमीचे सुशोभिकरण व विद्युत दाहीनी आणि गॅसदाहीनी सेवेत दाखल करणे इ. साठी सन २०१५-१६ मध्ये ₹ ३२ कोटी ३४ लक्ष ४० हजार इतकी तरतूद करण्यात आली आहे.

६८) नव्याने बांधकाम परवानगी देताना विकासकांनी इमारतीमध्ये पाण्याच्या पुन: वापर करणेसाठी स्वतंत्र उपाययोजना करण्याचे बंधन घातले जात असुन सद्यस्थितीतील जे मालमत्ता धारक पिण्याच्या पाण्याव्यतिरीक्त अन्य प्रयोजनासाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्याचा पुन: वापर करण्याची योजना महानगरपालिकेच्या नगररचना विभागाच्या संमतीने अंमलात आणतील त्यांना पाणी पट्टीच्या देयकात २% सवलतीसह योजना खर्चाच्या २०% परंतु अधिकतम ₹ १ लक्ष इतका खर्च अदा करणेची तरतूद केली आहे.

६९) नव्याने विकसित केल्या जाणाऱ्या मालमत्तांसाठी रेन वॉटर हार्वेस्टींग योजनेची अंमलबजावणी सक्तीने चालू असुन यामुळे नविन इमारतींना रेन हार्वेस्टींग व्यवस्था झाली आहे. यामुळे भुगर्भातील पाण्याची पातळी वाढणेस मदत झाली आहे. सबब अस्तित्वात असणाऱ्या सध्याच्या मालमत्तांबाबत महानगरपालिकेच्या संमतीने रेन वॉटर हार्वेस्टींग प्रकल्प अंमलात आणणाऱ्या मालमत्ता धारकांना याकामी प्रोत्साहन देणेकामी मालमत्ता करामधे सामान्य पाणीपट्टीचा भाग समाविष्ठ असल्याने मालमत्ता कराच्या २% सवलतीसह योजना खर्चाच्या २०% परंतु अधिकतम ₹ १ लक्ष इतका खर्च अदा करणेची तरतूद केली आहे.

७०) विद्युत ऊर्जेची बचत करणेकामी महानगरपालिकेकडे प्रथम नोंदणी करुन गृहनिर्माण संस्थाच्या प्रांगणांमधे सौर ऊर्जेवरील दिवे व सोलर वॉटर हिटर चा वापर करण्याऱ्या व्यक्ती व संस्थाना एकत्रित मालमत्ता कराच्या २% सवलतीसह योजना खर्चाच्या २०% परंतु अधिकतम ₹ १ लक्ष इतका खर्च अदा करणेची तरतूद केली आहे.

७१) निसर्ग ऋण प्रकल्प राबविणेसाठी एकत्रित मालमत्ता कराच्या २% सवलतीसह योजना खर्चाच्या २०% परंतु अधिकतम ₹ १ लक्ष इतका खर्च अदा करणेची तरतूद केली आहे.

७२) रस्त्यावरील विक्रेते व फेरीवाल्यांचे व्यवसाय क्षेत्र निश्चित करुन रहदारीला अडथळा निर्माण होणार नाही अशा पद्धतीने त्यांचे नियंत्रण करुन ना फेरीवाला क्षेत्र निश्चितीचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.

असा हा वैशिष्टपुर्ण सर्वसमावेशक बहुजनांच्या प्रगतीचा, विकासाचा अर्थसंकल्प तयार करताना मा. महापौर, मा. उपमहापौर, यांचे मौलीक मार्गदर्शन तसेच मा. सभागृह नेते, मा. विरोधी पक्षनेते, मा. गटनेते, मा. स्थायी समिती सदस्य, सर्व प्रभाग समित्यांचे सन्मा. सभापती, मा. परिवहन समिती सभापती, मा. महिला बाल कल्याण समिती सभापती, मा. आयुक्त व इतर अधिकारी यांनी वेळोवेळी केलेल्या सहकार्याची मी जाणीवपूर्वक नोंद घेत आहे.

आपल्या कामातून "प्रगतीचा प्रकाश हाच बहुजन विकास" हे पालिकेचे ब्रीदवाक्य सार्थ होईल याची मला खात्री असुन त्यासाठी आपण सदैव प्रयत्न करुया. मा. स्थायी समितीने सादर केलेला हा अर्थसंकल्प मंजुर करणेस माझी आपणांस विनंती आहे.

वसई - विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मान्यवर पत्रकार, प्रसार माध्यमे व वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील तमाम जनतेने वेळोवेळी सहकार्य केले आहे. त्याबद्दल त्यांचा मी अत्यंत आभारी आहे. मा. स्थायी समितीने मंजुर केलेला हा अर्थसंकल्प मी आपणासमोर सादर केला असुन ही संधी लोकनेते मा. आमदार श्री. हितेंद्रजी ठाकूर साहेब, मा. आमदार श्री. विलासजी तरे साहेब, मा. आमदार श्री. क्षितीजजी ठाकूर साहेब, मा. प्रथम महापौर साहेब, मा. प्रथम उपमहापौर साहेब, मा. महापौर साहेब, मा. उपमहापौर साहेब, सर्व मा. पदाधिकारी, व माझे मा. स्थायी समितीतील सर्व सहकारी तसेच माझ्या पक्षातील सर्व सन्मा. सदस्य व कार्यकर्ते यांनी ही संधी दिली याबद्दल मी आपणा सर्वांचा सदैव ऋणी राहीन.

धन्यवाद !

जय हिंद ! जय महाराष्ट्र !

आपला,

(संदेश लखुजी जाधव)
सभापती
स्थायी समिती
वसई - विरार शहर महानगरपालिका